कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्ग

# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उदघाटन

मुंबई , १४ जानेवारी, २०२१:- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक, श्री रणजीत सिंह देओल यांच्या हस्ते आज मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उदघाटन करण्यात आले.

मराठी भाषेचे वैभव जपण्याच्या हेतूने मुं.मे.रे.कॉ.द्वारे दिनांक १४ ते २८ जानेवारी दरम्यान साजरा करण्यात येणाऱ्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यादरम्यान निबंध स्पर्धा, काव्य लेखन स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा तसेच अभिवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी व्यवस्थापकीय संचालक श्री रणजित सिंह देओल यांनी मुं.मे.रे.कॉ मध्ये कार्यरत अमराठी अधिकारी व कर्मचार्यांनी मराठी भाषा अवगत करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे तसेच कर्मचाऱ्यांनी त्यांच्या दैनंदिन कार्यालयीन कामात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करावा असे आवाहन केले.

संचालक (प्रणाली) श्री ए.ए.भट्ट, संचालक (वित्त) श्री अबोधकुमार खंडेलवाल, कार्यकारी संचालक (नियोजन) श्री. आर रमणा -सर्व अमराठी अधिका-यांनी आपले मनोगक्त मराठीतून व्यक्त केले. काही मराठी भाषिक कर्मचाऱ्यांनीही आपले विचार व्यक्त करताना भाषेच्या समृद्ध इतिहासावर प्रकाश टाकला.

उदघाटन प्रसंगी महाव्यवस्थापक (प्रशासन आणि भूमी) श्रीमती माधवी सरदेशमुख यांनी प्रस्तावना प्रस्तुत केली. या वेळी इतर वरिष्ठ अधिकारी- कार्यकारी संचालक (रोलिंग स्टॉक) श्री राजीव, कार्यकारी संचालक (सिग्नल व दूरसंचार) श्री राजीव कुमार आणि इतर अधिकारी ही उपस्थित होते. 【समाप्त】

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com